**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsakola@yahoo.com**

**वर्धा कृषि हवामान सल्ला** **दिनांक – मंगळवार १४ जुलै २०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १५ जुलै २०२० ते १९ जुलै २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १५/०७ | १६/०७ | १७/०७ | १८/०७ | १९/०७ |
| पाऊस (मिमी) | १० | २० | १० | ७ | ५ |
| कमाल तापमान (अं.से.) | ३४ | ३३ | ३२ | ३२ | ३३ |
| किमान तापमान (अं.से.) | २४ | २३ | २२ | २३ | २३ |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९५ | ९० | ८८ | ९० | ८२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५८ | ५८ | ६० | ५६ | ५३ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| वा-याची दिशा | २९६ | २४८ | २४८ | २४९ | २८८ |

| हवामानाचा इशारा | हवामाना अंदाजा नुसार दिनांक १४ ते १६ जुलै दरम्यान विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्यासह सर्वत्र हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. तसेच त्यानंतरच्या दोन दिवसा दरम्यान बहुदा सर्वत्र हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सर्व पिक | | जिल्ह्यात मागील दिवसात पडलेल्या पाउसाचा फायदा घेत बहुदा सर्व पेरणी आटोपल्या आहेत, तरी ज्या ठिकाणी अध्याप पेरणी बाकी आहेत अश्या ठिकाणी वातावरणाचा अंदाज घेऊन सोयाबीन व तुरची पेरणी लवकरात लवकर पूर्ण करावी. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंडेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. वेळेवर पेरणी केलेल्या ठिकाणी पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे आटपावी सर्व पिकात उगवण नंतर तणनाशकांची फवारणी करताना लेबल क्लेम शिफारसीनुसार फवारणी करावी. |
| सोयबीन | पेरणी/उगवणी/ सुरुवातीची वाढीची अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या ठिकाणी पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी. तसेच १५ ते २० दिवसांच्या सोयाबीन पिकात वातावरणाचा अंदाज घेऊन तण व्यवस्थापनासाठी उगवण पाश्चात तणनाशकांमध्ये इमेझीथायपर १०% एसएल @ १०-१५ मिली किंवा इमेझीथायपर + इमजोमॉक्स ७० % डब्ल्यूजी@२ ग्राम किंवा प्रोपक्विझाफॉप २.५ % + इमेजिथायपर ३.७५ % @ ४० मिली प्रती १० लिटर पाण्यामध्ये फवारणी करावी. ज्या ठिकाणी खोड माशीचा प्रादुर्भाव आढळून आला असेल त्या ठिकाणी खोड माशीच्या सर्वेक्षणासाठी एकरी ४ ते ५ पिवळी चिकट सापळे उभारावेत. खोड माशीच्या व्यवस्थापनेसाठी बळी पडलेल्या झाडाचा किडग्रस्त भाग नष्ट करावा. जर पादुर्भाव आर्थिक नुकसानीची पातळीपेक्षा जास्त (१०% किडग्रस्त झाडे ) असेल तर क्लोरनट्रानिप्रोल १८.५ % @ ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| कपाशी | उगवणी/ सुरुवातीची वाढीची अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या ठिकाणी पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी व पेरणी वेळी खते दिली नसल्यास वातावरणाचा अंदाज घेऊन त्वरित खते द्यावी. तसेच कपाशी पिकाशी २० ते ३० दिवसाच्या अवस्थेत तण व्यवस्थापानासाठी वातावरणाचा अंदाज घेऊन उगवण पाच्श्रात तणनाशकांमध्ये पायरिथिओबेक सोडियम १०% ई.सी. @ १२.५ ते १५ मिली किंवा पायरिथिओबेक सोडियम ६% ई.सी. + क्विझॉलोफॉप इथील ४% ई. सी. @ २० ते २५ मिली प्रती १० लिटर पाण्यात फवारणी करावी. |
| तूर | पेरणी/ उगवणी | मागील तीन दिवसात पुरेसा पाऊस झालेला आहे तरी तुरीची पेरणी राहिली असल्यास या आठवड्यात संपवावी, शिफारसी नुसार तुरीची पेरणीसाठी लवकर येणारे वाण वापरावे. पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी कार्बेंझिन + थायरम (फोर्मुलेटेड मिक्षर)@ २ ते ३ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | मुग व उडीद पिकासाठी पेरणी योग्य ओलावा असेल तिथे पेरणी करावयाची असल्यास संपवावी. मुग पेरणीसाठी शिफरास केलेल्या जाती मध्ये पिकेवि- ग्रीन गोल्ड, पिकेवि-मुग ८८०२, पिकेवि - एकेएम-४ आणि उडीद पिकासाठी वाण जसे पिकेवि- उडीद -१५, टीएयु - १, टीएयु - २ व पिडीकेवि ब्लाक गोल्ड (एकेयु -१०-१). पेरणीपुर्वी बियाण्यास बीज प्रक्रियासाठी रायझोबियम २५ ग्रॅम /किलो, पीएसबी २५ ग्रॅम/किलो, ट्रायकोडर्मं ४ ग्रॅम/किलो, थायरम + कार्बेंदेससीम २+१ ग्रॅम/किलो, या प्रमाणात करावी. |
| मका | उगवणी/ सुरुवातीची वाढीची अवस्था | मका पिकासाठी वेळेवर पेरणी केलेल्या ठिकाणी पावसाची उघडीप पाहून आंतरमशागतीची कामे म्हणजे डवरणी व निंदन करून पिक ताणविरहित ठेवावी. |
| ज्वारी | उगवणी/ सुरुवातीची वाढीची अवस्था | ज्वारीची पेरणी राहिले असल्यास या आठवड्यात संपवावी. शिफारसी नुसार ज्वारीची पेरणी साठी लवकर येणारे वाण वापरावे. पेरणीसाठी लवकर येणारे वाण सीएसएच-३०, मध्यम कालावधीचे वाण सीएसएच-३५, एसपीएच-१६३५, सुधारित जातीमध्ये पीडीकेव्ही कल्याणी, सीएसव्ही-२०, सीएसव्ही-२७, सीएसव्ही-३४ वापरावे. शाश्वत पिक पद्धती मध्ये अंतरपिके घेतल्यास पिक उत्पन्नाची जोखीम कमी होऊ शकते त्यासाठी ज्वारी + मुग / उडीद / तूर (३:३), कपाशी + ज्वारी + तूर + ज्वारी (३:१:१:१), या प्रमाणे पेरणी करावी. |
| भाजीपाला | - | मिरची, वांगी, टोमाटेची, पत्तागोबी व फुलगोबी या पिकांची ४ ते ६ आठवडे वयांचे रोपाची शेतात लागवड करावी. भेंडी, वाल, चवळी, कारली, ढेमसे, भोपळा, कोहळे, दोडके, व अद्रक यांची लागवड करावी. निशिगंध या फूल पिकांची लागवड करावी. |
| फळझाडे | - | लागवडीसाठी खोदलेले खड्डे तयार करून रोपांची लागवड करावी. ज्या फळबागेत पाणी साचून आहे अश्या अतिरिक्त पाणीला उताराच्या दिशेने चर खोदून बाहेर काढावे. |
| पशु / जनावरे | | पावसाळ्यात शेळ्या-मेंढ्यांना कोवळा हिरवा चारा खाल्ल्याने पोटात जंतूंची वाढ होते व विष तयार होते व विषबाधा होते ते टाळण्यासाठी आंत्रविषार रोगाच्या लसीच्या १५ दिवसांच्या अंतराने दोन मात्रा टोचून घ्याव्यात. जनावरांना पशुवैदकांचे सल्ल्या नुसार लसीकरण करावे. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.